




# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३३९ वा गुरूवार दि ०९ एप्रिल २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये


# महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडी, काँग्रेसने बारामतीत उमेदवार देण्याचे राजकीय गणित काय?

वृत्तसंस्था/ पुणे

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे बारामती विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त झाली आहे. या रिक्त जागेसाठी निवडणूक आयोगाकडून पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि शिवसेना या तीनही पक्षांच्या वतीने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना या पोटनिवडणुकीत बिनविरोध निवडून द्यावं, असं आवाहन सर्वपक्षीय नेत्यांना करण्यात आलं होतं. महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या दोन्ही पक्षांनी सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला होता. पण काँग्रेसने या निवडणुकीत उमेदवार दिला आहे. त्यामुळे बारामतीच्या पोटनिवडणुकीबाबत महाविकास आघाडीत एकमत नसल्याचं स्पष्ट झालं आहे. काँग्रेसने बारातमी पोटनिवडणुकीत उमेदवार देणं याकडे राजकीय विश्लेषक एका वेगळ्या नजरेने पाहत आहेत. या पोटनिवडणुकीत कुणाचा विजय होईल? ही नंतरची गोष्ट आहे. पण काँग्रसने बारामतीच्या पोटनिवडणुकीत उमेदवार देणं याकडे काँग्रेसच्या दूरदृष्टीचे आणि नव्या रणनीतीचं राजकारण म्हणून पाहिलं जात आहे. महाराष्ट्रातील सध्याच्या राजकीय घडामोडी पाहिल्या तर सध्या तीन पक्षांचं सरकार स्थिर असलं तरी महायुतीमध्ये अनेकदा कुरबुरी ऐकायला मिळतात. तसेच २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप स्वबळावर लढण्याच्या तयारीत असल्याच्या देखील चर्चा समोर येत असतात. विशेष म्हणजे २०२९ च्या तयारीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून मित्रपक्षांचं खच्चिकरण करण्याचे प्रयत्न केले जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात नियमित सुरु असते. अशा या परिस्थितीत भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांच्या विरोधात तितक्याच ताकदीने सामना करण्यासाठी काँग्रेस आता तयारी करत आहे. महाराष्ट्रात विरोधी पक्षाची खूप मोठी पोकळी निर्माण झाली आहे. विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षांचं संख्याबळ पाहता विधानसभेत विरोधी पक्षनेते पदासाठी जितक्या जागांची आवश्यकता असते तितक्या जागांवरही विरोधी पक्षांना विजय मिळवता आलेला नाही. त्यामुळे विधानसभेच्या सभागृहात विरोधी पक्षनेताच नाही. अशा परिस्थितीत विरोधी पक्षाची पोकळी पूर्ण करण्यासाठी आणि जनतेसमोर नवा पर्याय उभा करण्यासाठी आता काँग्रेस फ्रंटलाईनला येण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे बारामतीच्या पोटनिवडणुकीत काँग्रेसने उमेदवार उभा करणे हे महत्त्वाचे ठरताना दिसत आहे. बारामती पोटनिवडणुकीत उमेदवार देणं ही काँग्रेसची २०२९ च्या निवडणुकांची तयारी आहे का? असा देखील प्रश्न उपस्थित केला जात आहे. राज्यासह देशात भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांचा ताकदीने सामना करणारा एकच पक्ष आहे आणि तो म्हणजे काँग्रेस पक्ष. काँग्रेस पक्षाची प्रत्येक राज्यात पक्ष संघटना आहे. काही राज्यांमध्ये कदाचित ती ताकदवान नसेलही पण क्राँग्रेसची पक्ष संघटना तिथे सक्रीय आहे हे महत्त्वाचं आहे. भाजपचा सामना करण्याची ताकद असलेल्या काँग्रेस




हा एकमेव राष्ट्रीय पक्ष आहे. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांमध्ये भाजप सत्तेत आल्यापासून काँग्रेसची पिछेहाट झाली असली तरी महाराष्ट्रात काँग्रेसने संघटनेची नीट बांधणी केली तर काँग्रेसला इथे आपला जम बसवता येऊ शकतो हे मात्र तितकंच खरं आहे. त्यामुळे काँग्रेस आता त्याची मोर्चेबांधणी करताना दिसत आहे. आगामी २०२९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत भाजप आणि त्यांच्या सर्व मित्रपक्षांचा सामना करण्यासाठी किंवा या पक्षांच्या राजकारणाला कंटाळलेल्या जनतेला पर्याय म्हणून काँग्रेस स्वत:चे अस्तित्व नव्याने स्थापन करण्याच्या प्रयत्नात असल्याची चर्चा आहे. पक्ष संघटना तितकीच मजबूत करुन नवी रणनीती आखत काँग्रेस महाराष्ट्रात पावलं टाकताना दिसत आहे. विशेष म्हणजे काँग्रेस यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या व्यतिरिक्त पुढे कसं जायचं? यासाठीदेखील मोर्चेबांधणी करताना दिसत आहे. बारामतीची पोटनिवडणूक हे त्याचेच उदाहरण आहे.

---

# खाकीची अब्रू चिरडली! अकोला पोलिसांकडून संग्रामपूर पोलिसांवर जीवघेणा हल्ला; गुप्तधन प्रकरणाने उडाली खळबळ

जनसंचलन/बुलढाणा

कायद्याचे रक्षकच भक्षक बनले तर जनतेने कोणावर विश्वास ठेवायचा? अशी संतप्त प्रतिक्रिया उमटवणारी धक्कादायक घटना संग्रामपूर तालुक्यात उघडकीस आली आहे. तामगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असलेल्या पोलिसांवर थेट अकोला पोलीस दलातील कर्मचाऱ्यांनीच जीवघेणा हल्ला केल्याने संपूर्ण पोलीस विभाग हादरला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस अंमलदार संतोष आखरे आणि प्रमोद मुळे हे मध्यरात्री गस्त घालत असताना ङ्गगुप्तधनफ प्रकरणाची माहिती तपासून परत येत होते. यावेळी त्यांना दोन संशयित दिसले. साधी चौकशी करताच आरोपी राजेश गव्हाळे आणि मनोज गव्हाळे यांनी संतापाचा स्फोट केला. वाद वाढताच त्यांनी थेट पोलिसांवर हल्ला चढवला. हातातील स्टीलच्या कड्याने संतोष आखरे यांच्या पाठीवर आणि कपाळावर जबर वार करण्यात आले. या हल्ल्यात आखरे गंभीर जखमी होऊन रक्तबंबाळ झाले. मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रमोद मुळे यांनाही आरोपींनी धक्काबुक्की करत जिवे मारण्याची धमकी दिली. विशेष म्हणजे, दोन्ही आरोपी हे अकोला पोलीस दलातीलच कर्मचारी असल्याचे समोर आले आहे.या प्रकरणी तामगाव पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून तपास ठाणेदार पंडितराव सोनवणे करत आहेत. मात्र, ङ्खाकीफ्वरच हल्ला करणाऱ्या या पोलिसांवर कठोर कारवाई होणार का? असा संतप्त सवाल आता जनतेतून उपस्थित होत आहे. एकीकडे जनता सुरक्षिततेसाठी पोलिसांवर विश्वास ठेवते, तर दुसरीकडे अशा घटनांनी खाकीची प्रतिमा काळवंडत असल्याचे स्पष्ट झाले आहे. आता अकोला पोलीस प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# बापाचं नाव मोठं मुलीनं कामानं ठोकलं! शितल बुधवत थेट राज्यात ९वी!

जनसंचलन/बुलढाणा

बीजापोटी फळे रसाळ ही म्हण बुलढाण्यात अक्षरशः खरी ठरली! शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत आणि माजी जि.प. उपाध्यक्ष कमलताई बुधवत यांच्या कन्या शितल बुधवत हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत थेट राज्यातून ९वा क्रमांक पटकावत कर सहाय्यक पदावर झेंडा रोवला आहे. बुलढाण्यातील भारत विद्यालयातून शिक्षण घेतल्यानंतर फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करत शितलने स्पर्धा परीक्षेच्या रणांगणात दमदार एन्ट्री घेतली. पुण्यातील कठोर मेहनत, शिस्त आणि ध्येयवेड या जोरावर तिने हे यश खेचून आणले. वडील जालिंदर बुधवत हे केवळ राजकारणी नसून समाजकारणात अग्रेसर नाव आहे. त्यांच्या कार्याचा प्रभाव शितलवर ठळकपणे दिसून आला. सरकारी सेवेतून समाजसेवाफ्फ हा मंत्र मनाशी बांधत तिने यश मिळवलं. शितलच्या या दणदणीत यशामुळे जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, बुधवत कुटुंबाचा वारसा आता नव्या पिढीत झळकतोय!अशी चर्चा रंगली आहे. स्वतः शितलने या यशाचे श्रेय आई-वडील व गुरुजनांना दिले आहे.

# गेल्या काही दिवसापासून चिखली मतदारसंघ चर्चेत...

गेल्या काही दिवसापासून चिखली मतदारसंघ चर्चेत आहे. अगदी शेजारचा पण येऊन आपला हक्क चिखली वर दाखवतो. अस प्रत्येकजण येऊन म्हणतो चिखली आपली आहे बर.अरे बाबा ही चिखली आहे.कळायला अन समजायला खूप वेळ लागेल. काँग्रेसला तर आता दुसरे कामच राहील नाही.सकाळी उठले की श्वेताताई आणि महाले साहेब दिसतात. झोपले तरी त्यांची हिच परिस्थिती आहे. हे दोघेजण तुमच्यासारखे गाव गुंडाच राजकारण करत नाही.. मला आठवत २०१३ -१४ चा तो काळ ताई राजकारणात नवख्या होत्या. ताईचे वडील व साहेबांचे वडील राजकारण व समाजकारणात सक्रिय होते.



जेव्हा गाडी घरून निघायची तेव्हा समोरच्या सीट वर ताई असायच्या मधल्या सीट वर एका साईटला त्यांचे वडील तर दुसऱ्या साइडला महाले साहेब यांचे वडील मधात मात्र मी असायचो ताई नवीन मी नवीन मात्र ह्या दोघांच्या गप्पा मात्र राजकारणाच्या असायच्या आपले जे झाले ते झाले ताई आणि विद्याधर यांनी आपल्या ह्या गोरगरीब, दिन दलित , शोषित पीडित ,कष्टकरी समाजाची सेवा करावी. ह्या त्यांच्या गप्पा सारख्या असायच्या बाकी नेते मंडळींनी काय केलं ते सर्व विसरून आपल्या ह्या मुलांनी मात्र समाज एकत्र आणावा आणि आपल्या मायभूमीचा विकास करावा . एखाद्या गावात जर गेलो तर महाले बाबा म्हणायचे मी दयासागर महाले माझा मुलगा मंत्रयात खाजगी सचिव म्हणून आहे विद्याधर महाले ही माझी सुनबाई श्वेताताई तर दुसरा आवाज यायचा अंकुशराव पाटील यांचा मी मोठ्या मेराचा अंकुशराव पाटील ही माझी मुलगी आहे आमदारकीसाठी विधानसभेची तयारी करत आहे भाजप कडून आशीर्वाद राहू द्या.. परत दुसऱ्या गावात गेली की गाडीत गंमत जमत व्हायची दयासागर बाबा म्हणायचे अंकुशराव मी समाजाची सेवा खूप केली पण आता इच्छा आहे सूनबाईला आमदार कराव तर दुसरा आवाज यायचा अंकुशराव पाटील यांचा माझी इच्छा आहे माझ्या मुलीने पण आमदार झाल पाहिजे. सर्व परिवाराचे खूप मेहनत घेतली पण २०१४चे आमदारकीचे तिकीट कटले तरी न थांबता तयारी सुरू ठेवली पुढे जिल्हा परिषदेच्या निवडणुका लागल्या भाऊसाहेब फुंडकर यांनी महाले साहेब यांना बोलून सागितले श्वेताताई ला आपल्या ला जिल्हा परिषद ला उभे करायचे आहे ताई निवडणुकीत जिंकून पण आल्या .तेव्हा पासून काँग्रेस चे माजी आमदार राहुल बोंद्रे यांच्या पायाखालची वाळू हळूहळू सरकू लागली. पुन्हा विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या ताईंना उमेदवारी मिळाली पण समोर काँग्रेस चा बलाढ्य उमेदवार होता पैसा गडगंज, क्रूर राजकारणी, अनेकांना ज्यांनी भूमिहीन करणारा, गोर गरीब सामान्य माणसाच्या जमिनी बळकावणारा, शिक्षणमहर्षीच्या नावाखाली फक्त स्वतःच्या संस्था मोठ्या केल्या. दूध डेअरी काढली ती पूर्ण लाटून टाकली. सूतगिरणीचे पण तेच हाल केले. साखर कारखान्याच्या नावाने कोट्यवधीचे कर्ज काढून शेतकऱ्यांना फसविले.शेतकऱ्यांची जिव्हाळ्याची असलेली जिल्हा बँक बुडविली.१० वर्षाच्या आमदकीच्या काळात फक्त स्वतःचा विकास केला.

२०१९ च्या निवडणुकीत पराभवाच्या भीतीने पोलिस स्टेशन मध्ये जाऊन दगड फेक करणे . गावागावात समाजसमजात भांडण लावणे हेच काम ह्या माजी आमदाराने केले आहे.२०१९ च्या निवडणुकीत पराभव झाला तरी हा पठ्ठ्या सुधारला नाही. अडीच वर्ष महाविकास आघाडीचे सरकार आले तेव्हा हा बहाद्दर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे गेला विद्याधर महाले साहेब यांची तक्रार करायला .याला फक्त स्वतःचा विकास पाहिजे ताई आमदार झाल्या दुर्दैवाने अडीच वर्षांनी पुन्हा महायुतीचे सरकार आले .महाले साहेब फडणवीस साहेब यांचे खाजगी सचिव झाले. दोघांनी आपल्या वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न करून आमदार ताईंना सात देऊन कोट्यवधी रुपयांचा निधी खेचून आणला. आणि नागरिकांना दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या.. विकास काय असतो हे ह्या जोडप्यांनी केला.

आता तरी ह्या या माजी आमदाराने सुधारावे काल त्यांनी भाड्याने महिला आणून विद्याधर महाले साहेब यांच्यावर क्रूर खोटे आरोप केले. भाऊ आम्हाला पण सर्व काही करता येते पण आम्ही तुमच्यासारखे क्रूर राजकारणी नाही आहोत.

तुमचे सर्व कारणामे आहे योग्य वेळ आली तेव्हा सांगू तुम्हाला महाले दांपत्य काय आहे ते.शेजारचा तुम्हाला भेटायला आला म्हणून तुम्ही असे खोटे नोटकी राजकारण करता का. आम्ही लोकांसारखे हप्ते घेत नाही. गुंडगिरी किंवा भाई गिरी करत नाही.आम्ही पण तेल लावलेलं पहिलवान आहे .फक्त आम्ही दाखवत नाही आमची ही सस्कृति नाही. आम्ही कोणाला धमकावत नाही तुमच्या सारख्या जमिनी बळकावल्या नाही. उलट विकासच राजकारण केलं अन करत राहू. यापुढे जर कोणी आमच्या वाट्याला गेला तर त्याला तसाच तस उत्तर देऊ...

**सुरेश इंगळे पाटील**
**स्वियसहाय्यक**
**आ सौ श्वेताताई महाले पाटील**






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

## पाकिस्तानच्या मध्यस्थीने युद्धविराम जाहीर; जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम स्पष्ट

# शस्त्रसंधीत इस्त्रायलचा खोडा... लेबनॉनवरील हल्ल्यांमुळे इराण संतप्त; होर्मुझची पुन्हा नाकेबंदी

**वॉशिंग्टन/दुबई/वृत्तसंस्था :** इराण आणि अमेरिका व इस्रायल यांच्यात गेले ३९ दिवस सुरू असलेली धुमश्चक्री थांबवून, पाकिस्तानच्या पुढाकाराने बुधवारी शस्त्रसंधीच्या मुद्द्यावर तिन्ही देशांमध्ये मतैक्य झाले खरे. पण हा शस्त्रसंधी लेबनॉन आणि हेझबोलावरील कारवाईस लागू नाही अशी भूमिका इस्रायल आणि अमेरिकेने घेतली.

तो घोषित झाल्यानंतर अवघ्या काही तासांत इस्रायलकडून झालेल्या हल्ल्यात लेबनॉनमधील २००हून अधिक नागरिक ठार झाले. त्यामुळे संतप्त होऊन इराणने होर्मुझ सामुद्रधुनीची पुन्हा नाकेबंदी केली. तसेच लेबनॉनवरील हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्याचीही घोषणा केली.

अमेरिकी वेळेनुसार मंगळवारी रात्री साडेआठ वाजता आणि भारतीय वेळेनुसार बुधवारी पहाटे साडेचार वाजता अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धसमाप्तीच्या वाटाघाटींसाठी दोन आठवड्यांचा शस्त्रसंधी जाहीर केला. त्यास इराणकडूनही लगेच मान्यता मिळाली. पाकिस्तानच्या शिष्टाईने घडून आलेल्या या विरामामुळे जगभर समाधान व्यक्त करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय तेल, भांडवल, चलन बाजारांमध्येही या घटनेचे सकारात्मक प्रतिबिंब उमटले. पण तरीदेखील नंतरच्या काही तासांमध्ये इराणकडून सौदी अरेबिया, तसेच कुवेतवर आणि इस्रायलकडून इराणवर हल्ले झाले. त्यानंतरही शस्त्रसंधीच्या अंमलबजावणीसाठी हालचाली सुरू झाल्या होत्या. मात्र लेबनॉनमधील हेझबोला संघटनेच्या विरोधात इस्रायली हल्ले दिवसभरात तीव्र झाले. त्यामुळे इराणनेही प्रत्युत्तराचा निर्धार व्यक्त केला.

तसेच होर्मुझ सामुद्रधुनीचीही नाकेबंदी केल्याने शस्त्रसंधी आणि संभाव्य युद्धसमाप्तीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ट्रम्प यांनी शस्त्रसंधी जाहीर करताना इस्रायलकडूनही हल्ले थांबवले जातील, असे म्हटले होते. इस्रायलने तरीदेखील लेबनॉनवर हल्ले सुरू ठेवून शस्त्रसंधीमध्ये खोडा घातला.

### पाकिस्तानची यशस्वी शिष्टाई

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणी संस्कृती बेचिराख करण्याची धमकी दिल्यानंतर युद्धाची तीव्रता वाढण्याची चिंता व्यक्त केली जात होती. मात्र पाकिस्तानच्या मध्यस्थीने दोन आठवड्यांचा युद्धविराम झाला आहे. पाकिस्तानने दोन्ही देशांना शुक्रवारी (१० एप्रिल) इस्लामाबादमध्ये चर्चेसाठी आमंत्रण दिले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणने पाठविलेला १० मुद्द्यांचा प्रस्ताव प्राप्त झाल्याचे सांगून त्यावर वाटाघाटी शक्य असल्याचे म्हटले आहे. इराणच्या या मुद्द्यांच्या आधारावरच त्यांच्याशी चर्चा केली जाईल, असे ट्रम्प म्हणाले. अमेरिकेच्या या भूमिकेवर इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा मंडळाने अमेरिकेला इराणचे १० मुद्दे तत्त्वत: मान्य असल्याचे म्हटले आहे. यामध्ये इराणवरील सर्व निर्बंध उठवणे, इराणमध्ये झालेल्या नुकसानाची भरपाई देणे आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण मिळविण्याचा समावेश आहे.

### शेअर बाजारात तेजीला उधाण..

युद्धविरामाची घोषणा झाल्यामुळे जगभरातील गुंतवणूकदारांचा उत्साह वाढला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या घडामोडीचे वर्णन जागतिक शांततेसाठी एक मोठा दिवस असे केल्याने त्याचे पडसाद देशांतर्गत भांडवली बाजारावर देखील उमटले. प्रमुख निर्देशांक सेन्सेक्सने २,९४६.३२ अंशांनी उसळी घेत ७७,५६२.९० पातळी गाठली. सत्रादरम्यान, ३,०१८.९६ अंशांची झेप घेतली होती. निफ्टी ८७३.७० अंशांनी उसळला आणि २३,९९७.३५ अंशांवर बंद झाला.



### खनिज तेलाचा दिलासा

होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्याची अट इराणने मान्य केल्याने ऊर्जा पुरवठ्यातील व्यत्ययाबाबतच्या चिंता काहीशा कमी झाल्या आहेत. त्यापरिणामी 'ब्रेंट क्रूड'च्या किमती १३.८९ टक्क्यांनी घसरून ९४.०९ अमेरिकी डॉलर प्रतिपिंपापर्यंत नरमल्या आहेत.

### शनिवारपासून पाकिस्तानमध्ये चर्चा

**वॉशिंग्टन :** इराणशी चर्चा करण्यासाठी पाकिस्तानला उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ जाणार आहे, अशी माहिती व्हाइट हाऊसच्या माध्यम सचिव कॅरोलिन लेविट यांनी दिली. चर्चेची पहिली फेरी शनिवारी पार पडेल असे त्यांनी सांगितले. व्हान्स यांच्याबरोबरच्या शिष्टमंडळात अमेरिकेचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि ट्रम्प यांचे जावई जारेड कुश्नर यांचाही समावेश असेल. व्हान्स यांनी इराणच्या मुद्द्यावर सुरुवातीपासून महत्त्वाची भूमिका बजावली आहे असे लेविट म्हणाल्या. इराणी शिष्टमंडळाचे नेतृत्व पार्लमेंटचे अध्यक्ष मोहम्मद बाकेर कालिबाफ आणि परराष्ट्रमंत्री सईद अब्बास अराघची यांच्याकडे असेल.

---

# उत्खनन रॉयल्टी, बिनशेती प्रक्रिया होणार डिजिटल : बावनकुळें

## • राज्यातील बांधकाम क्षेत्रासाठी दिलासा..

**मुंबई/वृत्तसंस्था**

बांधकाम करताना उत्खनन करण्यात आलेले गौण खनिज त्याच जागी वापरले तर त्याला रॉयल्टी माफ करण्यात आली असून, बिनशेतीसाठी आता जिल्हाधिकारी यांच्याकडे जाण्याची आवश्यकता नाही. ही प्रक्रिया दहा दिवसात ऑनलाईन करण्यात येणार आहे. याबरोबरच महापालिका आणि मिळकतपत्रावरील नोंदीबाबत संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्याचे आश्वासही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

राज्यभरातील बांधकाम व्यावसायिकांना भेडसावणारे प्रश्न आणि प्रलंबित मागण्यांबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात क्रेडाईच्या प्रतिनिधींसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली. बांधकाम क्षेत्राला गती देण्यासाठी आणि प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करण्यासाठी अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. बांधकाम करताना होणाऱ्या खोदकामासाठी आकारल्या जाणाऱ्या रॉयल्टीबाबत क्रेडाईने मांडलेले प्रश्न महसूलमंत्र्यांनी मार्गी लावले आहेत. सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे, उत्खननानंतर निघालेले गौणखनिज जर त्याच



बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी वापरले जात असेल, तर त्यावर कोणतीही रॉयल्टी आकारली जाणार नाही. यामुळे प्रकल्पाचा खर्च कमी होण्यास मदत होणार आहे. रॉयल्टी भरण्याची प्रक्रिया आता अधिक सुटसुटीत करून ती सहा महिन्यांच्या कालावधीसाठी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बिगरशेती परवान्यासाठी लागणारा वेळ व क्लिष्ट प्रक्रिया कमी करण्यासाठी महसूल विभागाने कालबद्ध कार्यक्रम आखला आहे. एनएची संपूर्ण पद्धत येत्या दहा दिवसांत पूर्णपणे कार्यान्वित करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत. यामुळे गृहप्रकल्पांच्या कामात येणारे प्रशासकीय अडथळे दूर होतील.

# दिंडोरी अपघातातील मृतांच्या वारसांना ४५ लाखांची मदत

**मुंबई/वृत्तसंस्था :** दिंडोरी तालुक्यातील शिवाजीनगर येथे ३ एप्रिल २०२६ रोजी घडलेल्या दुर्दैवी अपघातात एकाच कुटुंबातील ९ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. घटनेची दखल घेऊन मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने मदत देण्याचे निर्देश दिले होते. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ५ लाख याप्रमाणे एकूण ४५ लाख रूपये आर्थिक मदत मंजूर करण्यात आली असून, रक्कम जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. इंदोरे गावातील एकाच कुटुंबातील सदस्य प्रवास करत असलेल्या वाहन विहिरीत पडल्याने हा अपघात घडला. मृतांमध्ये रेश्मा सुनील दरगोडे, आशा अनिल दरगोडे, खुशी (सृष्टी) अनिल दरगोडे, श्रेयस अनिल दरगोडे, राखी सुनील दरगोडे, श्रावणी अनिल दरगोडे, समृद्धी राजेंद्र दरगोडे, माधुरी अनिल दरगोडे व सुनील दत्तू दरगोडे यांचा समावेश आहे. या प्रकरणी मृतांच्या वारसांची पडताळणी करून मंजूर मदत तातडीने वितरित करण्याबाबत जिल्हा प्रशासनास निर्देश



देण्यात आले आहेत. गरजू नागरिकांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीबाबत अधिक माहितीसाठी टोल-फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# मागील वर्षभरात रेल्वेकडून राज्यात एकच नवी गाडी

**मुंबई/वृत्तसंस्था :** मागील आर्थिक वर्षात राज्यातील रेल्वे प्रवाशांसाठी केवळ एकच नवीन गाडी सुरू करण्यात आली. तर राज्याबाहेर जाणाऱ्या सहा नव्या रेल्वेगाड्यांना हिरवा कंदील दाखविण्यात आला आहे. यामुळे स्थानिक प्रवाशांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

मध्य रेल्वे प्रशासनाने राज्याबाहेरील लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांना प्राधान्य दिल्याचे स्पष्ट होत आहे. राज्यातील प्रमुख शहरांदरम्यान म्हणजेच मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर येथील प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता राज्यांतर्गत रेल्वेगाड्यांची नितांत



गरज आहे. ज्या गाड्या धावत होत्या. त्या बंद केल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. राज्याबाहेर जाणाऱ्या सहा नव्या गाड्यांमुळे बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळाला असला, तरी स्थानिक प्रवाशांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका रेल्वे प्रवासी संघटनांकडून करण्यात येत आहे. राज्यांतर्गत रेल्वेगाड्या जास्त संख्येने सुरू झाल्यास रस्त्यावरील वाहनांची संख्या कमी होऊ शकते. परिणामी, वाहतूक कोंडी कमी होऊन अपघातांचे प्रमाणही घटण्यास मदत होईल. राज्यातील रस्ते अपघात रोखण्यासाठी राज्यांतर्गत रेल्वे सेवा वाढवणे आवश्यक असल्याचे मत रेल्वे वाहतूक तज्ज्ञ अक्षय महापदी यांनी व्यक्त केले.

# 200 सीसीटीव्ही, अनेक गाड्यांची झडती, चोराच्या मनात चांदणे, धावला अन् अडकला, पोलिसांनि मुसक्या आवळल्या

**नागपूर** : ऑनलाइन बेटिंगमध्ये झालेल्या मोठ्या आर्थिक नुकसानीमुळे एका तरुणाने गुन्हेगारीचा मार्ग स्वीकारल्याची धक्कादायक घटना नागपुरात उघडकीस आली आहे. नागपूर लोहमार्ग पोलिसांनी रेल्वेमधील तब्बल 22.70 लाख रुपयांच्या दागिन्यांच्या चोरीचा यशस्वी छडा लावला आहे. नांदेड येथील 23 वर्षीय व्हेटरनरी शिक्षण घेत असलेला विद्यार्थी रोहित मारोती दुय्येवार याला अटक केली आहे. ही घटना 29 मार्चला पहाटे नागपूर रेल्वे स्थानकावर घडली होती. रायपूर येथील हरिशचंद चंदवाणी हे आपल्या कुटुंबासह बिकानेर एक्सप्रेसने प्रवास करत होते. प्रवासादरम्यान त्यांच्या पत्नीने सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असलेली पर्स डोक्याखाली ठेवून झोप घेतली होती. गाडी नागपूर स्थानकावर थांबलेली असताना आरोपीने त्यांच्या झोपेचा फायदा घेत पर्स चोरून नेली. काही वेळाने ती पर्स बाथरूममध्ये रिकामी अवस्थेत आढळून आल्याने चोरीचा प्रकार उघडकीस आला.घटनेची माहिती मिळताच नागपूर लोहमार्ग पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. या प्रकरणात 200 हून अधिक सीसीटीव्ही फुटेज



तपासण्यात आले. तपासादरम्यान एक संशयित व्यक्ती चोरी करून स्टेशनबाहेर जाताना दिसून आली. त्यानंतर रॅपिडो बुकिंगमधून मिळालेल्या मोबाईल क्रमांकाच्या आधारे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. यामधून आरोपी नांदेड येथील असल्याचे स्पष्ट झाले.पोलिसांनी विशेष पथक तयार करून आरोपीचा शोध सुरू केला. दरम्यान, आरोपी नांदेडहून नागपूरकडे ट्रॅव्हल्सने येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचला. नांदेड नागपूर मार्गावरील 9 ते 10 ट्रॅव्हल्स तपासण्यात आल्या. अखेर रहाटे कॉलनी परिसरात संशयित दिसताच त्याने पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून रोहित दुय्येवार याला ताब्यात घेतले. सुरुवातीला आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र सीसीटीव्ही फुटेज दाखवल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून 17.43 लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त केले असून उर्वरित मुद्देमालाचा शोध सुरू आहे.तपासात आरोपी हा उच्चशिक्षित असून नागपुरात व्हेटरनरी डॉक्टरचे शिक्षण घेत असल्याचे समोर आले आहे.

ऑनलाइन बेटिंगमध्ये मोठ्या प्रमाणात पैसे गमावल्यामुळे त्याने चोरीचा मार्ग अवलंबल्याची कबुली त्याने दिली. या प्रकरणामुळे तरुणांमध्ये वाढत चाललेल्या ऑनलाइन जुगाराच्या व्यसनाबाबत पुन्हा एकदा चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक गौरव गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून आरोपीला न्यायालयाकडून पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## अनेक दिवस पोलिसांच्या रडारवर, गुन्हा करुन चकवा द्यायचा, अखेर जेरबंद

**छत्रपती संभाजीनगर** : गेल्या अनेक दिवसांपासून पोलिसांच्या डोळ्यात धूळ फेकून पसार होणाऱ्या एका अट्टल गुन्हेगाराला जेरबंद करण्यात वाळूज पोलिसांना मोठे यश आले आहे. हा आरोपी खूप चपळ होता. तो सहजासहज पोलिसांच्या हाती यायचा नाही. त्याने एखादा गुन्हा केल्यानंतर तो संबंधित जिल्ह्यातूनच गायब व्हायचा. त्यामुळे गुन्ह्याचा तपास करणाऱ्या पोलिसांपुढे मोठं आव्हान उभं राहायचं. आरोपीचा थांगपत्ता कसा लावायचा? याचं पोलिसांपुढे मोठं आव्हान असायचं. पोलीस त्याचा शोध घेण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत होते. अखेर पोलिसांनी तांत्रिक गोष्टींच्या आधारावर आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. विशेष म्हणजे त्याला पकडल्यानंतर त्याने अनेक गुन्ह्यांची कबुली देखील दिली आहे. पोलिसांच्या या कारवाईचं सध्या शहरात कौतुक होत आहेया प्रकरणातील आरोपीचे नाव राहुल कंत्राज पवार असे आहे. तो डोमेगावचा रहिवासी आहे. त्याच्या अटकेमुळे पाच जिल्ह्यांतील तब्बल 9 गंभीर गुन्ह्यांचा उलगडा झाला आहे. या कारवाईत पोलिसांनी 3 लाख रुपयांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.राहुल पवार हा अत्यंत सराईत चोरटा आहे.




त्याची गुन्हे करण्याची पद्धत पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरली होती. तो एका जिल्ह्यात घरफोडी किंवा चोरी केल्यानंतर तात्काळ आपले ठिकाण बदलून दुसऱ्या जिल्ह्यात आश्रय घेत असे. वाळूज पोलिसांनी त्याचा शोध घेण्यासाठी मिरजगाव, जामखेड, पुणे यांसारख्या विविध भागांत तपास केला. मात्र तो प्रत्येक वेळी पोलिसांना चकवा देऊन पळून जाण्यात यशस्वी होत होता.वाळूज पोलीस ठाण्याच्या विशेष पथकाने तांत्रिक माहितीच्या आधारे राहुलचा पाठलाग सुरूच ठेवला. अखेर 25 मार्चला पुणे जिल्ह्यातील इंदापूरमध्ये एका परिसरात सापळा रचून त्याला ताब्यात घेण्यात आले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने वाळूजसह पुणे, बीड, अहिल्यानगर आणि कोल्हापूर जिल्ह्यांत केलेल्या चोऱ्यांची कबुली दिली.

## स्वयंपाक घरात येऊन झोपला बिबट्या

**सिंधुदुर्ग** : वेंगुर्ला तालुक्यातील दाभोली गावात बिबट्याने शिरकाव केला. पण बिबट्या गावात शिरल्याची बातमी लगेच समोर आली नाही. हा बिबट्या गावातील एका घरात स्वयंपाकघरात गाढ झोपलेला बघायला मिळाला. यानंतर संबंधित घरातील रहिवाशांची झोपच उडाली. त्यांनी तातडीने पोलिसांना या घटनेची माहिती दिली. तसेच बिबट्या गावातील एका घरात स्वयंपाकघरात झोपल्याचं वृत्त वाऱ्यासारखं गावात पसरलं. या घटनेमुळे संपूर्ण गावात भीतीचं वातावरण निर्माण झालं. या घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे कर्मचारी आणि पोलीस गावात दाखल झाले. त्यांनी बिबट्याचे अतिशय शिस्तबद्धपणे रेस्क्यू केलं. राज्यात गेल्या काही महिन्यांपासून बिबटे हे भर वस्तीत येऊ लागल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. कोकणातही हे प्रकार घडू लागले आहेत. तळकोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात बिबट्या चक्क घरात प्रवेश करून आरामात झोपल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या सगळ्या प्रकाराने भीतीच वातावरण आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ली तालुक्यातील दाभोली गावात कोऱ्याची वाडी येथे हा धक्कादायक प्रकार घडला आहे.

## 'जनावर' समजून थेट तरुणांवर गोळीबार

**सिंधुदुर्ग** : सिंधुदुर्ग जिल्ह्यात पंधरा दिवसापूर्वी कणकवली येथे एका बिल्डरचा खून झाल्याची घटना ताजी असतानाच आता वैभववाडी तालुक्यात शिकाऱ्याच्या बंदुकीने गोळी लागून एकाचा दुर्दैवीरीत्या मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेने अवघा सिंधुदुर्ग जिल्हा हादरला आहे. सागर सुरेश पोटळे (वय २६, रा. घाणेगडवाडी, आचिर्णे) असं मृत्यू झालेल्या युवकाचे नाव आहे. तर कृष्णा सुरेश कातकर (वय २५) गंभीरित्या जखमी झाला आहे. हा सगळा धक्कादायक प्रकार मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडला आहे. शिकारीसाठी कोणीतरी जनावर आलं आहे, असे समजून हा गोळीबार झाला. यातच या युवकाचा मृत्यू झाला तर एक युवक गंभीर जखमी झाला आहे.वैभववाडी तालुक्यातल्या आचिर्णे गावात मंगळवारी रात्री ही गोळीबाराची धक्कादायक घडली आहे. घाणेगडवाडी परिसरात झालेल्या या प्रकारात एका २६ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला असून, आणखी एक जण गंभीर जखमी झाला आहे. वैभववाडी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आचिर्णे गावातील कालव्याजवळ हे तरुण शिकारीसाठी गेले होते. त्याच वेळी हा दुर्दैवी प्रकार घडला.सखल भागात उभे असताना उंच भागावरून कोणीतरी जनावर असल्याच्या संशयावरून गोळीबार केल्याची



प्राथमिक माहिती तपासात पुढे आली आहे. या गोळीबारात सागर पोटळे याच्या चेहऱ्यावर व हातावर गोळ्या लागून त्याचा मृत्यू झाला, तर कृष्णा कातकर यांच्या अंगावर तब्बल अकरा ठिकाणी गोळ्या लागल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक मनोज सोनावळकर यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेत पंचनामा व जबाब घेण्याचे काम सुरू आहे. तर मृतदेह शवविच्छेदनासाठी कणकवली उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आला असून, जखमी कृष्णा कातकर याच्यावर कणकवलीतील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांकडून त्याचा जबाब नोंदवण्याचे काम सुरु असून पुढील तपास पोलीस करत आहेत.दरम्यान यापूर्वीही कणकवलीत शिकारीदरम्यान झालेल्या अशाच प्रकारात एकाचा बळी गेल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा एकदा निष्काळजीपणामुळे जीव गमावण्याची वेळ आल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

## बहुराष्ट्रीय कंपनीत महिलांचा विनयभंग आणि अत्याचार; 8 पीडितांची तक्रार, 9 गुन्हे दाखल

**नाशिक** : भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण ताजे असताना आता नाशिकमधील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग, लैंगिक अत्याचार आणि धार्मिक भावना दुखावल्याचा खळबळजनक प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी आतापर्यंत एकूण 9 गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी या प्रकरणात तत्परता दाखवत 6 संशयित आरोपींना अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कंपनीत कार्यरत असलेल्या काही पुरुष कर्मचाऱ्यांकडून महिलांचा गेल्या काही 2 वर्षांपासून मानसिक आणि लैंगिक छळ सुरू होता. अखेर पीडित महिलांनी तक्रार केल्यानंतर या प्रकाराची



भीषणता समोर आली आहे. प्रकरणाचे गांभीर्य आणि संवेदनशीलता ओळखून नाशिक शहर पोलीस आयुक्तांनी या तपासासाठी SIT स्थापन केली आहे आहे.या घटनेच्या पार्श्वभूमीवर, पोलीस प्रशासनाने सर्व खाजगी आस्थापनांना सदर ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे कडक निर्देश दिले आहे. कामाच्या ठिकाणी महिलांना कोणताही त्रास होत असल्यास त्यांनी न घाबरता पुढे यावे, असे आवाहन देखील शहर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

ज्यासाठी अधिकृत व्हॉट्सॲप क्रमांक ९९२३३२३३११ वर मेसेज पाठवू शकतात किंवा आपत्कालीन परिस्थितीत ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच तक्रारदाराची ओळख गोपनीय ठेवली जाईल असे देखील यावेळी सांगण्यात आले आहे.एकूण ८ पीडित महिला यांनी या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे. तर एका पुरुषाने देखील दिलेल्या तक्रारीहून 1 गुन्हा असे एकूण 9 गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शब्बीर शेख, शफी शेख, रजा मेमन, आसिफ अन्सारी, शाहरुख कुरेशी, तौसीफ अत्तार असे ताब्यात घेण्यात आलेल्या संशयित आरोपी यांचे नाव आहेत. आठ दिवसांपूर्वी याबाबत पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यांनतर आज दुसऱ्या गुन्ह्या संदर्भात 5 संशयितांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने या प्रकरणी 2 दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

सरकारी वकिलांकडून आज सुनावणी दरम्यान युक्तीवाद करण्यात आला की, या प्रकरणाचा आणखी तपास करणे बाकी असून, आणखी काही महिलांच्या तक्रारी पुढे येण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तर आरोपींच्या वकिलांनी "या सगळ्या प्रकरणाचा तपास झाला आहे.

# गुजरातचा दिल्लीवर अखेरच्या चेंडूवर थरारक विजय, एका धावेने असा जिंकला सामना

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यातील अटीतटीच्या सामन्यात गुजरातने अखेरच्या चेंडूवर बाजी मारली आहे. गुजरातने दिल्लीचा घरच्या मैदानावर फक्त एका धावेने पराभव केला. दिल्लीकडून केएल राहुलने ९२ धावांची खेळी केली, तर डेव्हिड मिलरने २० चेंडूत ४१ धावा केल्या, पण संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकले नाहीत. तर गुजरातकडून रशीद खानच्या ३ विकेट्स महत्त्वपूर्ण ठरल्या. यासह गुजरात टायटन्सने यंदाच्या हंगामातील पहिला विजय नोंदवला आहे.



दिल्लीला अखेरच्या षटकांमध्ये १२ चेंडूत ३६ धावांची गरज होती. १९वं षटक टाकण्यासाठी मोहम्मद सिराज आला. या षटकात मिलरने किलर फलंदाजी करत सामना अटीतटीचा केला. मिलरने या षटकात दोन षटकार व एक चौकार लगावला. तर विप्रज निगमने एक चौकार लगावला आणि या षटकात २३ धावा कुटल्या. यासह दिल्ली कॅपिटल्सला विजयासाठी अखेरच्या षटकांत १३ धावांची गरज होती. विप्रज निगम स्ट्राईकवर होता, तर प्रसिध कृष्णा गोलंदाजी करत होता आणि त्याने पहिल्याच चेंडूवर चौकार लगावला. पाचव्या चेंडूवर मोठा फटका खेळताना विप्रज झेलबाद झाला आणि नंतर आलेल्या कुलदीपने लगेचच एक धाव घेत मिलरला स्ट्राईक दिली.

आता दिल्लीला विजयासाठी ३ चेंडूत ८ धावांची गरज होती. यानंतर तिसऱ्या चेंडूवर मिलरने दणदणीत षटकार लगावला. त्यानंतर २ चेंडूत २ धावांची गरज असताना पाचव्या चेंडूवर मिलर व कुलदीपने एकही धाव घेतली नाही, ज्यामुळे दिल्लीवरचा दबाव वाढला आणि अखेरचा चेंडू निर्णायक ठरला. अखेरच्या चेंडूवर दिल्ली फक्त एक धाव घेण्यात यशस्वी ठरली. यासह गुजरातने एका धावेने सामना जिंकला. डेव्हिड मिलरने पाचव्या चेंडूवर २ धावांची गरज असताना एक धाव घेण्यास नकार दिल्याची चूक दिल्लीला महागात पडली आणि परिणामी संघाने एका धावेने सामना गमावला.


गुजरात टायटन्सनने दिलेल्या २११ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरूवात चांगली झाली. पथुम निसांका व केएळ राहुल यांनी पहिल्या विकेटसाठी ७६ धावांची भागीदारी रचली. पथुम निसांका २४ चेंडूत ६ चौकार व एका षटकारासह ४१ धावा करत बाद झाला. यानंतर नितीश राणा ५ धावा, समीर रिझवी गोल्डन डक तर कर्णधार अक्षर पटेल २ धावांवर बाद झाले. तर डेव्हिड मिलर १२ धावांवर रिटायर्ड हर्ट झाला. फिल्डिंग करताना मिलरच्या हाताला दुखापत झाली होती. केएल राहुल मात्र २९ धावांवर अर्धशतक करत खेळत होता. पण मोहम्मद सिराजच्या १७व्या षटकात फटका मारण्याच्या प्रयत्नात केएल राहुल झेलबाद झाला. राहुलने ५२ चेंडूत ११ चौकार व ४ षटकारांसह ९२ धावांची उत्कृष्ट खेळी केली. डेव्हिड मिलरने २० चेंडूत ३ चौकार व ३ षटकारांसह ४१ धावा केल्या. गुजरात टायटन्सकडून रशीद खानने ३ विकेट्स तर प्रसिध कृष्णाने १ विकेट घेतली.

दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकत प्रथम गुजरात टायटन्सला फलंदाजीसाठी पाचारण केलं. गुजरातच्या टॉप-५ फलंदाजांनी मिळून २१० धावांचा डोंगर उभारला. साई सुदर्शन १२ धावा करत लवकर बाद झाला. यानंतर आलेल्या जोस बटलरने संघाचा डाव सावरत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. बटलर २७ चेंडूत ३ चौकार व ५ षटकारांसह ५२ धावा करत बाद झाला. यानंतर कर्णधार शुबमन गिल व वॉशिंग्टन सुंदर यांनी तिसऱ्या विकेटसाठी ६० चेंडूत १०४ धावांची भागीदारी रचली. शुबमन गिलने मोठ्या प्रतिक्षेनंतर टी-२० मध्ये अर्धशतक झळकावलं.

शुबमन गिलने या सामन्यात ४५ चेंडूत ४ चौकार व ५ षटकारांसह ७० धावा केल्या. तर वॉशिंग्टनने पहिलं आयपीएल अर्धशतक झळकावलं. वॉशिंग्टनने ३२ चेंडूत ६ चौकार व २ षटकारांसह नाबाद ५५ धावांची खेळी केली. तर ग्लेन फिलिप्सने १४ धावा केल्या. दिल्लीकडून मुकेश कुमारने २ विकेट्स तर लुंगी एनगिडी व कुलदीप यादवने १-१ विकेट्स घेतल्या.

## संघातून बाहेर असलेल्या शमीला राग अनावर

**दिल्ली :** 2025 मध्ये टीम इंडियासोबत आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणारा मोहम्मद शमी अजूनही संघात परतलेला नाही. टीम इंडियामधून वगळल्यानंतर, शमीने संपूर्ण हंगाम देशांतर्गत क्रिकेट खेळून उत्कृष्ट कामगिरी केली. असे असूनही, निवड समितीने त्याच्याकडे दुर्लक्ष केले, त्यामुळे आयपीएल 2026 हंगामात शानदार गोलंदाजी करणाऱ्या शमीने आपली व्यथा व्यक्त केली आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर, शमीसाठी आयपीएल 2025 चा हंगाम खूपच खराब गेला. यामुळे तंदुरुस्तीचा अभाव हे कारण सांगून त्याला कसोटी, एकदिवसीय आणि टी-20 संघात परत येता आले नाही. शमीने बंगालसाठी प्रथम-श्रेणी, एकदिवसीय आणि टी-20 या तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळून स्वतःला तंदुरुस्त सिद्ध केले. असे असूनही, अजित आगरकरच्या निवड समितीने या 35 वर्षीय वेगवान गोलंदाजाकडे दुर्लक्ष केले.जवळपास वर्षभर



संघाबाहेर असलेल्या शमीला कोणत्याही परिस्थितीत भारतीय संघात परतायचे आहे. नुकतेच त्याने शानदार गोलंदाजी करत केएल राहुलला पहिल्याच चेंडूवर बाद केले. त्यानंतर त्याने अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड यांना स्वस्तात बाद करून लखनौला हैदराबादविरुद्ध विजय मिळवून देण्यात मदत केली. त्यामुळे पुन्हा एकदा शमीला संघातून वगळण्यावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.बंगाल प्रो टी20 लीगच्या एका स्पर्धेदरम्यान, भारतीय संघातील आपल्या अनुपस्थितीबद्दल बोलताना शमी म्हणाला, "जर तुम्हाला पुन्हा त्या स्तरावर परतायचे असेल, तर तुमची भूक जिवंत राहिली पाहिजे. तुमचा उत्साह कमी होता कामा नये. आयुष्यात चढ-उतार आणि दुखापती असतात. आपण फक्त मजूर आहोत, आपण आपले काम पूर्ण मेहनत आणि प्रामाणिकपणाने करत राहिले पाहिजे."

मोहम्मद शमीच्या आकडेवारीनुसार, त्याने भारतासाठी 64 कसोटी सामन्यांमध्ये 229 बळी घेतले आहेत. त्याच्या नावावर 108 एकदिवसीय सामन्यांमध्ये 206 बळी आणि 25 टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये 27 बळी आहेत. शमी सध्या उत्कृष्ट फॉर्ममध्ये असून 2027 च्या एकदिवसीय विश्वचषकासाठी भारतीय संघात स्थान मिळवण्याचे त्याचे ध्येय आहे. त्याच्या नावावर 121 आयपीएल सामन्यांमध्ये 136 बळी देखील आहेत.

## वैशालीची दिव्यावर मात; महिलांमध्ये संयुक्त आघाडीवर; प्रज्ञानंदची बरोबरी

**पाफोस :** 'कँडिडेट्स' बुद्धिबळ स्पर्धेच्या नवव्या फेरीत महिला विभागात दोन भारतीय ग्रँडमास्टरमध्ये झालेल्या लढतीत आर. वैशालीने विश्वचषक विजेत्या दिव्या देशमुखला पराभूत करण्याची किमया साधली. त्याच वेळी झू जिनेरने कॅटरिना लायनोवर मात केली. त्यामुळे आता वैशाली आणि जिनेर समान ५.५ गुणांसह संयुक्तपणे आघाडीवर आहेत.

खुल्या विभागात आघाडीवर असणाऱ्या जावोखिर सिंदारोवने पुन्हा एकदा बरोबरीवर समाधान मानताना जर्मनीच्या माथियास ब्लुबाऊमविरुद्ध गुण विभागून घेतला. भारताच्या आर. प्रज्ञानंदला चांगल्या सुरुवातीनंतरही चीनच्या वे यीविरुद्ध केवळ बरोबरीच साधता आली. दिव्याच्या चुकीच्या निर्णयाचा वैशालीने फायदा घेतला. दिव्याने धोका पत्करला आणि पटाच्या मध्यभागावरील नियंत्रण तिने गमावले. त्यानंतर पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या वैशालीला तिचा वजीर आणि हत्ती सक्रिय करता आला. वैशालीने सातत्याने अचूक चाली रचत दिव्यावर दडपण आणले. अखेर वेळेचे गणित साधणे दिव्याला अवघड गेले आणि वैशालीने ३१ चालींत विजयाची नोंद केली.

टॅन झोंगयी आणि अॅना मुझिचुक, तसेच अॅलेक्सांड्रा गोर्याचकिना आणि बिबिसारा असाऊबायेवा यांच्यातील लढत बरोबरीत संपली. खुल्या विभागात, नेदरलँड्सच्या अनिश गिरीने अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाला पराभवाचा धक्का दिला. या निकालामुळे गिरी ४.५ गुणांसह दुसऱ्या स्थानी पोहोचला, तर कारुआनाची ४.५ गुणांसह तिसऱ्या स्थानी घसरण झाली. सिंदारोव सात गुणांसह आघाडीवर आहे.

## मुंबई इंडियन्सचा राजस्थानकडून गेम, मॅचचा टर्निंग पॉइंट कोणता?

**गुवाहाटी/वृत्तसंस्था :** राजस्थान रॉयल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धेतील लढतीला पावसाचा फटका बसला. पावसामुळे लढत केवळ ११ षटकांची झाली. पाऊस थांबल्यानंतर मात्र 'राजस्थान'च्या यशस्वी जयस्वाल आणि वैभव सूर्यवंशी यांनी धावांची बरसात केली. त्यामुळे 'राजस्थान'ने ११ षटकांत ३ बाद १५० धावांपर्यंत मजल मारली होती. या आव्हानाच पाठलाग करताना मुंबईच्या संघाला ११ षटकांत १२३-९ धावाच करता आल्या. सुरूवातीला गोलंदाजांनी सपाटून मार खाल्ला. त्यानंतर बॅटींग सपशेल अपयशी ठरल्याने मुंबईचा पराभव झाला. मात्र काही ठराविक खेळाडू ज्यांच्यामुळे मुंबई पूर्ण बॅकफूटला गेली.



चहर याने पहिल्या ओव्हरमध्येच २२ धावा दिल्या. या ओव्हरपासूनच राजस्थान टॉप गियरमध्ये गेली आणि संपूर्ण सामन्यात आपल्या वर्चस्व राखलं. दीपकचा हा फ्लॉप शो मुंबईच्या पराभवाचं कारण ठरला. दुसरा म्हणजे ट्रेंट बोल्ट, आंतरराष्ट्रीय गोलंदाज असलेल्या बोल्टला युवा यशस्वी जयस्वाल आणि वैभव सूर्यवंशी यांनी चोप दिला. कारण त्याच्याही ओव्हरमध्ये २२ धावा निघल्या. दोन महत्त्वाचे गोलंदाज अपयशी ठरल्याने मुंबईसाठी अडचणीचं ठरलं.

गोलंदाजांच्या अपयशानंतर फलंदाजांकडून सर्वांना अपेक्षा होती. मात्र मुंबईचा फलंदाजांमधील टॉप ऑर्डरपैकी एकही खेळाडू दुहेरी धावसंख्या गाठू शकला नाही. रोहित शर्मा ५ धावा, रिकल्टन ८ धावा, सूर्यकुमार यादव ६ धावा, तिलक वर्मा १४ धावा, हार्दिक पंड्या ९ धावा हे सर्व महत्त्वाचे फलंदाज स्वस्तात परतले. नमन धीर याने सर्वाधिक २५ आणि शेफर्डने २५ धावा केल्या.यशस्वी आणि वैभव यांनी ५ षटकांतच ८० धावांची सलामी दिली. १५ वर्षीय वैभवने १४ चेंडूत पाच षटकावर व एक चौकारासह ३९ धावा केल्या. यशस्वीने ३२ चेंडूंत १० चौकार व ४ षटकारांसह नाबाद ७७ धावा केल्या. यशस्वीने २३ चेंडूंत अर्धशतक ठोकले. हार्दिक पंड्याचा अपवाद वगळता त्याच्या तावडीतून एकही गोलंदाज सुटला नाही. त्याने चौफेर फटकेबाजी केली. यासह जयस्वालची आयपीएलमधील षटकारांची संख्या १०० झाली आहे. दरम्यान, राजस्थान संघाचा हा सलग तिसरा विजय ठरला असून त्यांनी पॉइंट टेबलमध्ये नंबर वनचे स्थान गाठले आहे. तर मुंबईचा हा सलग दुसरा पराभव झालाय.

# आईची आठवण आणि बिग बी झाले भावुक

**मुंबई :** अमिताभ बच्चन हे केवळ अभिनयासाठीच नव्हे, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वासाठीही देशभरात आदरणीय मानले जातात. सध्या सोनी टीव्हीवर सुरू असलेल्या लोकप्रिय रिॲलिटी गेम शो 'कौन बनेगा करोडपती १७' मध्ये त्यांच्या ८३व्या वाढदिवसानिमित्त विशेष एपिसोड प्रसारित करण्यात आला. या एपिसोडमध्ये जे घडलं, त्याने केवळ प्रेक्षकांचेच नव्हे, तर खुद्द बिग बींच्याही डोळ्यांत पाणी आणलं.

या खास भागात प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर आणि अभिनेता-निर्देशक फरहान अख्तर यांनी पाहुणे म्हणून हजेरी लावली. त्यांच्या उपस्थितीत प्रसारित करण्यात आलेल्या एका व्हिडिओ क्लिपमध्ये अमिताभ बच्चन यांच्या आई, स्वर्गीय तेजी बच्चन यांचे एक जुने वक्तव्य दाखवण्यात आले. त्या म्हणाल्या होत्या, ङमी खूप भाग्यशाली आहे. आता मी जिथेही जाते, लोक मला माझ्या मुलामुळे प्रेम आणि सन्मान देतात. एका आईसाठी याहून मोठं भाग्य काय असू शकतं?ङ आईच्या या भावना ऐकताच अमिताभ भावूक झाले आणि त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.





या क्षणाने संपूर्ण स्टुडिओमध्ये भावनांचा एक जिवंत वातावरण तयार झाला. एपिसोडमध्ये पुढे अमिताभ यांनी २००४ मध्ये आलेल्या 'लक्ष्य' या चित्रपटातील अनुभव शेअर केला. फरहान अख्तरने दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाच्या आठवणी सांगताना ते म्हणाले, ङत्या वेळी फरहान रात्री माझ्या खोलीत आला आणि विचारलं, 'अमिताभ अंकल, काही त्रास तर नाही ना?' आम्हाला वाटलं की, हा तर उस्ताद आहे - आम्हाला शिकवतोय की अभिनय कसा करायचा.

शोदरम्यान, एक गंमतीदार प्रसंगही घडला. जेव्हा फरहानने दोघांनाही विचारलं की, तुमच्यापैकी महिलांमध्ये कोण अधिक लोकप्रिय आहे? त्यावर अमिताभ यांनी लगेच जावेद अख्तर यांच्याकडे बोट दाखवलं. त्यावर जावेद साहब म्हणाले, हे काय प्रश्न आहे? हे विचारायची गोष्ट आहे का? आणि त्यांनी अमिताभ यांना हसत हसत सांगितलं, ङसगळं उघड करू नकोस. या विशेष भागाने प्रेक्षकांना केवळ मनोरंजनच नाही, तर भावना आणि स्नेहानेही भारावून टाकलं. वाढदिवसाच्या निमित्ताने प्रसारित झालेला हा कार्यक्रम अमिताभ बच्चन यांच्या आयुष्यातील एका महत्त्वाच्या क्षणाची साक्ष ठरला. त्यांचं आईवरचं प्रेम, कृतज्ञता आणि नम्रता याचा प्रत्यय या क्षणातून पुन्हा एकदा दिसून आला.



## बॉडी बिल्डर वरिंदर घुमनचा हार्ट अटॅकने मृत्यू

**नवी दिल्ली :** पंजाबी फिल्म इंडस्ट्रीतून एक वाईट बातमी आली आहे. अभिनेता आणि बॉडी बिल्डर वरिंदर सिंह घुमनचं निधन झालं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हृदयविकाराच्या झटक्याने त्याचं निधन झालं आहे. यानंतर चाहत्यांना धक्का बसला आहे. वरिंदरच्या मृत्यूच्या बातमीनंतर एकच शोककळा पसरली आहे. असं म्हटलं जात आहे की वरिंदर अमृतसरमधील फोर्टिस रुग्णालयात त्याच्या दुखापतीसाठी किरकोळ शस्त्रक्रिया करण्यासाठी गेला होता. तो घरी एकटाच निघून गेला होता. ही एक किरकोळ शस्त्रक्रिया असल्याने तो आज परतणार होता, परंतु अचानक त्याला हृदयविकाराचा झटका आला आणि त्याचं निधन झालं.

वरिंदर सलमान खानसोबत 'टायगर ३' चित्रपटात दिसला होता. त्याच्या बॉडी बिल्डिंग कौशल्याचं सर्वांनी कौतुक केलं होतं. सलमानचे चाहते त्याच्या शरीरयष्टीने मंत्रमुग्ध झाले होते. हा चित्रपट २०२३ मध्ये प्रदर्शित झाला होता. जेव्हा चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला तेव्हा वरिंदर त्याच्या पर्सनॅलिटीमुळे चाहत्यांमध्ये लोकप्रिय झाला. वरिंदरला फिटनेसचं फार वेड होतं. तो 'मिस्टर इंडिया २००९' चा विजेता होता. शिवाय, तो 'मिस्टर एशिया चॅम्पियनशिप' मध्येही दुसऱ्या क्रमांकावर राहिला होता. 'द ही-मॅन ऑफ इंडिया' म्हणून तो ओळखला जात होता.

***

## साऊथच्या 'लेडी सुपरस्टार'चे हे ५ चित्रपट तुम्हाला थक्क करतील



**हैदराबाद : दक्षिण भारतीय सुपरहिट अभिनेत्री नयनतारा आज चित्रपटसृष्टीत २२ वर्षे साजरी करत आहे. तिला दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीची 'लेडी शाहरुख' म्हणून ओळखले जाते. ४० वर्षीय या अभिनेत्रीने २००३ मध्ये मल्याळम चित्रपटसृष्टीतून तिच्या चित्रपट कारकिर्दीला सुरुवात केली. आज ती मल्याळम, तमिळ, तेलगू आणि कन्नड चित्रपटसृष्टीवर राज्य करते. २०२३ मध्ये तिने शाहरुख खानच्या 'जवान' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. नयनतारा तिच्या २२ वर्षांच्या चित्रपट कारकिर्दीत ७५ हून अधिक चित्रपटांमध्ये दिसली आहे. आपण या अभिनेत्रीबद्दल पाच अवश्य पहावे अशा चित्रपटांवर चर्चा करू.**

---

**आरम :** २०१७ च्या थ्रिलर सोशल ड्रामा चित्रपट 'आरम' मध्ये, नयनताराने एका संग्राहकाची भूमिका केली होती जो एका गावकऱ्याच्या पाण्याच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी प्रशासनाशी लढतो. या चित्रपटाचे दिग्दर्शन गोपी नैनार यांनी केले होते. तुम्ही तो Amazon Prime Video वर पाहू शकता.

---

**राजा आणि राणी :** जर तुम्हाला नयनताराच्या तमिळ रोमँटिक-कॉमेडियन चित्रपटांमध्ये रस असेल, तर तुम्ही अभिनेत्रीचा १२ वर्षे जुना चित्रपट, राजा राणी पाहू शकता. या चित्रपटात आर्या मुख्य भूमिकेत आहे. हा चित्रपट 'जवान' चे दिग्दर्शक ॲटली यांचा दिग्दर्शनात पदार्पण आहे, जो ब्लॉकबस्टर होता. तुम्ही हा चित्रपट YouTube वर मोफत पाहू शकता.

---

**नानुम राउडी धान :** विजय सेतुपती आणि नयनतारा स्टारर 'नानुम राउडी धन' हा चित्रपट पाहून तुम्हाला खूप आनंद होईल. २०१५ मध्ये प्रदर्शित झालेला हा ॲक्शन कॉमेडी चित्रपट तुम्हाला हादरवून टाकेल. तमिळ सुपरस्टार धनुष निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन नयनताराचे पती विघ्नेश शिवन यांनी केले आहे. संगीत अनिरुद्ध रविचंदर यांनी दिले आहे. चित्रपटात, नयनताराला एका स्फोटात बहिरे केले जाते, परंतु ती त्या स्फोटाची एकमेव साक्षीदार आहे. चित्रपटाचा कळस म्हणजे ती गुन्हेगारांना कसे ओळखते. तुम्ही 'आह' वर चित्रपट पाहू शकता.

---

**कोलामावू नाईटिंगेल :** नयनताराच्या सुपरहिट चित्रपटांपैकी, 'कोलामावू कोकिला' हा क्राइम-कॉमेडी चित्रपट चुकवू नका. ८ कोटी बजेटमध्ये बनलेला या चित्रपटाने ७० कोटींपेक्षा जास्त कमाई केली. २०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन नेल्सन दिलीपकुमार यांनी केले होते, ज्यांनी यापूर्वी रजनीकांतसोबत 'जेलर', थलापती विजयसोबत 'बीस्ट' आणि शिवा कार्तिकेयनसोबत 'डॉक्टर' असे चित्रपट बनवले आहेत. 'कोलामावू कोकिला'च्या कथेबद्दल बोलायचे झाले तर, ही एका मुलीची कथा आहे जी तिच्या आईच्या कर्करोगाच्या उपचारासाठी पैसे देण्यासाठी ड्रग्ज तस्करीत अडकते. 'कोलामावू कोकिला' हा चित्रपट ZEE5 वर पाहता येईल.

---

**जवान :** नयनताराने २० वर्षांनंतर बॉलिवूडमध्ये पदार्पण केले आणि ती खळबळजनक बनली. या अभिनेत्रीने शाहरुख खानसोबत 'जवान' या चित्रपटात काम केले होते, जिथे तिने एका पोलिस अधिकाऱ्याची भूमिका केली होती. 'जवान'चे दिग्दर्शन ॲटली यांनी केले होते. 'जवान' हा शाहरुख खान आणि नयनताराचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट आहे, तसेच ॲटलींचाही सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट आहे, ज्याने जगभरात १,१०० कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# होमियोपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनीमन, वैद्यकीय क्षेत्रातील ईश्वरीय देणगी



जनसंचलन/ बुलढाणा

१० एप्रिल म्हणजेच होमियोपॅथिचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनीमन यांचा जन्म दिवस. जन्म दिवस हा जागतिक होमियोपॅथि दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने आपण होमियोपॅथि व डॉ. सॅम्युअल हॅनेमन यांच्याविषयी जाणून घेऊया.

डॉ. हॅनेमन यांचा जन्म १० एप्रिल १७५५ मध्ये जर्मनी येथे झाला. ते शालेय जीवनात अत्यंत हुशार असून वयाच्या२० व्या वर्षी ग्रीक, इंग्रजी, लॅटीन, अरेबी, स्पॅनिष, जर्मन अशा जवळपास डझनभर भाषांवर प्रभुत्व मिळविले होते. त्यांनी वैद्यकीय क्षेत्रामध्ये प्रदार्पन करून एम. डी. ही पदवी प्राप्त केली होती. त्यांनी काही वर्षे मेडीकल प्रॅक्टीस केल्यानंतर त्यांना तत्कालीन वैद्यकीय प्रॅक्टीसबद्दल असंतुष्टता निर्माणझाली. त्यामुळे त्यांनी ते बंद करून प्राचीन वैद्यकीय ग्रंथांचे भाषांतर करण्याचे कार्य सुरु केले. हे करत असतांना त्यांना सिंकोना बार्क या औषधाच्या गुणधर्माबद्दल असे असे माहीत पडले की, ही औषधी जर एखाद्यानिरोगी व्यक्तीलादिली तर त्याला मलेरियाच्या आजारासारखे लक्षणे उद्भवतात व हीच औषधी जर मलेरिया रुग्णाला आजारपणात दिली असता तो बरा होतो. हे माहीत पडल्यावर त्यांनी त्या औषधीचा प्रयोग स्वत:वर केला तर त्यांना उपरोक्त सिद्धांत खरा आढळून आला. त्यातुनच त्यांना होमियोपॅथिचा शोध लागला. नंतर त्यांनी खुप अभ्यास आणि प्रयोग केले.त्यांच्या या रिसर्च मुळे होमियोपॅथी हे एक नविन वैद्यकीय पद्धती उदयास आली व विकसित होत गेली. होमियोपॅथी हि एक परिपुर्ण व नैसर्गिक उपचार पद्धती आहे. होमियोपॅथिमध्ये रुग्णाच्या सर्व बाजुने विचार केला जातो. त्याच आजाराचे लक्षण व कारणे तसेच त्याच्या खाण्यापिण्याच्या सवयी, मानसिक गुणधर्म, स्वभाव, आयुष्यात आलेल्या संकटांना वा घटनांना तो कशाप्रकारे प्रतिसाद देतो, त्याची शारिरीक प्रकृती व ठेवण वरिल सर्व बाबींचा विचार करून त्याच्यावर योग्य असे होमियोपॅथिक औषध दिले जाते. होमियोपॅथिक उपचाराचे पुढीलप्रमाणे फायदे किंवा इतर वैद्यकीय शास्त्रांपेक्षा कशी श्रेष्ठ आहे हे आपण जाणून घेऊया. होमियोपॅथिने आजार सौम्यपणे, जलदगतीने व पुर्णपणे बरा होतो. काही आजारांना जसे की बि.पी. , डायबेटिस, मायग्रेन, संधिवात व असे बरेच आजार ज्यामध्ये रुग्णांना आमरण औषधे द्यावी लागतात, हे आजार होमियोपॅथिच्या उपचाराने काही कालावधी मध्ये बरे होऊ शकतात. जेव्हा रुग्णांना एक पेक्षा जास्त आजार असतांना जसे की, त्वचारोग, पोटाचा विकार, सांध्यांचा आजार या सर्व विकारांचा उपचार एकाच ठिकाणी होऊ शकतो म्हणजे रुग्णाला वरील सर्व तज्ञांकडे जाण्याची गरज भासत नाही. होमियोपॅथी औषधांचा कुठलाही साईड ईफेक्ट नसतो.

# टिव्ही अँड डिजिटल मीडियाच्या जर्नालिस्ट असोसिएशनच्या बुलढाणा तालुका अध्यक्षपदी दिपक मोरे



जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणापत्रकारांच्या हितासाठी सदैव लढा देणाऱ्या टिव्ही अँड डिजिटल मीडियाच्या जर्नालिस्ट असोसिएशनच्या बुलढाणा तालुकाध्यक्षपदी दीपक मोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बुलढाणा येथे पार पडलेल्या संघटनेच्या बैठकीमध्ये सर्वांमध्ये हा निर्णय घेण्यात आला टिव्ही अँड डिजिटल मीडियाच्या जर्नालिस्ट असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष राहुल पहुरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बुलढाणा येथील स्थानिक विश्राम भवनात संघटनेचे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा झाल्यानंतर बुलढाणा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये तालुकाध्यक्ष नियुक्त करण्याचा प्रस्ताव संघटनेचे जिल्हाध्यक्ष फहीम देशमुख यांनी मांडल्यानंतर सर्वांनी या विषयाला तात्काळ मान्यता दिली. त्यानंतर बुलढाणा येथून या विषयाची सुरुवात करण्यात आली यामध्ये बुलढाणा येथील पत्रकार दीपक मोरे यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब झाले. यानंतर जिल्हाध्यक्ष फहीम देशमुख यांनी त्यांना तालुकाध्यक्ष म्हणून घोषित केले. यावेळी मोरे यांचा सर्व सन्माननीय पदाधिकाऱ्यांच्या हस्ते स्वागता सत्कार करण्यात आले. संघटनेला बळकटी येण्यासाठी विविध उपक्रम आणि उपाययोजना करून पत्रकारांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यासाठी आपण सदैव लढा देणार असल्याची ग्वाही यावेळी नवनियुक्त तालुकाध्यक्ष दीपक मोरे यांनी दिली. या बैठकीला संस्थापक अध्यक्ष राहुल पहूरकर, जिल्हाध्यक्ष फहीम देशमुख, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य संजय जाधव,युवराज वाघ,संदीप शुक्ला, माजी जिल्हाध्यक्ष अमोल गावंडे, वसीम शेख,प्रफुल खंडारे, संदीप वानखडे, दिपक मोरे, किशोर खंडारे, निलेश राऊत, संतोष करे आदींची यावेळी उपस्थिती होती. बैठकीचे संचालन संघटनेचे सचिव प्रफुल्ल खंडारे यांनी तर आभार अमोल गावंडे यांनी मानले.

# एचपीव्ही लस सुरक्षित; अफवांना बळी पडू नका-डॉ. अमोल गीते यांचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणारा गर्भाशय मुखाचा कॅन्सर हा गंभीर आणि चिंताजनक आजार ठरत असून, त्यापासून बचावासाठी एचपीव्ही () लसीकरण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांनी स्पष्ट केले आहे. लसीबाबत समाजात पसरत असलेल्या अफवा व गैरसमजांना बळी न पडता नागरिकांनी जागरूकता ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, ह्युमन पॅपिलोमा व्हायरस () हा गर्भाशय मुखाच्या कॅन्सरचा मुख्य कारणीभूत घटक आहे. या विषाणूपासून संरक्षण मिळवण्यासाठी एचपीव्ही लस प्रभावी उपाय ठरते. विशेषतः ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींसाठी ही लस अधिक उपयुक्त असून, योग्य वयात घेतल्यास भविष्यात कॅन्सरचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो.सध्या सोशल मीडियावर लसीबाबत चुकीची माहिती पसरवली जात आहे. काही ठिकाणी लसीमुळे गंभीर दुष्परिणाम होतात, अशी भीती निर्माण केली जात आहे; मात्र ही माहिती पूर्णपणे चुकीची आहे. एचपीव्ही लस आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त असून अनेक देशांमध्ये ती सुरक्षितपणे वापरली जात आहे, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते सांगितले.एचपीव्ही लस का महत्त्वाची : गर्भाशय मुखाच्या कॅन्सरपासून प्रभावी संरक्षण, एचपीव्ही संसर्गाचा धोका कमी, योग्य




वयात घेतल्यास दीर्घकालीन लाभ, सुरक्षित आणि परिणामकारक लसीकरण, गैरसमज दूर करा : लसीमुळे गंभीर दुष्परिणाम होत नाहीत, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरण पूर्णपणे सुरक्षित, अफवांपेक्षा डॉक्टरांचा सल्ला अधिक विश्वासार्ह.मुलींच्या आरोग्यासाठी वेळेवर एचपीव्ही लसीकरण करून त्यांना गंभीर आजारांपासून सुरक्षित ठेवावे. महिलांमध्ये गर्भाशय मुखाच्या कॅन्सरचे वाढते प्रमाण लक्षात घेता, एचपीव्ही लस घेणे ही काळाची गरज आहे. ही लस सुरक्षित असून कॅन्सरचा धोका कमी करण्यास मदत करते, असेही त्यांनी नमूद केले.

# जागतिक आरोग्य दिनानिमित्त जिल्हा रुग्णालयात विविध उपक्रमांचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा रुग्णालय व परिचारिका प्रशिक्षण केंद्र, बुलढाणा येथे विविध उपक्रमांचे आयोजन करून जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षीचा घोषवाक्य ङ्कद्वएकत्रित प्रयत्न आरोग्यासाठी, विज्ञानाची साथ भविष्यासाठीफ्फ यावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी प्राचार्य उज्वला खेडेकर, मेट्रन आरती कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान जागतिक आरोग्य दिनाचे महत्त्व अधोरेखित करत आरोग्य विषयक विविध शासकीय योजनांचा आढावा घेण्यात आला. प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर विशेष भर देण्यात आला. मार्गदर्शनपर भाषणात जोशी सर यांनी निरोगी समाज निर्मितीसाठी सर्व घटकांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले. आधुनिक विज्ञानाच्या साहाय्याने आरोग्य सेवा अधिक प्रभावी करता येतात, तसेच स्वच्छता, संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. यावेळी ङ्कद्वमाझे गाव, आरोग्य संपन्न गावफ्फ मोहिमेअंतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. ग्रामीण भागात जनजागृतीसाठी सोशल मीडिया, स्थानिक माध्यमे, वृत्तपत्रे व यशोगाथांचा प्रभावी वापर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमात आरोग्य पर्यवेक्षक अनिल लोखंडे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले, तसेच परिचारिका प्रशिक्षणार्थींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेताल वक्तव्य करणाऱ्या आ. संजय गायकवाडांवर गुन्हे दाखल करा-बुलढाणा भाजपची मागणी...

**जनसंचलन/बुलढाणा**

आमदार संजय गायकवाड यांनी बुलढाणा येथील पत्रकार परिषदेत भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्यावर खालच्या भाषेत खोटे आरोप करून सोबतच आदिवासी आश्रम शाळेतील मुलींची बदनामी कारक वक्तव्य केल्या प्रकरणी बुलढाणा भाजपच्या वतीने आज दि. ८ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा पोलिस अधिक्षक यांना निवेदन सादर करून ॲट्रॉसिटी व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद आहे की, बुलढाण्याचे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी त्यांच्या कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार विजयराज शिंदे साहेब यांच्या विरोधात बेताल वक्तव्य केले. त्यांच्या या बेताल वक्तव्याचा आम्ही जाहीर निषेध व्यक्त करतो. आमदार गायकवाड यांनी पत्रकारांसमोर जाहीर कॅमेरात बोलताना सांगितले की, विजयराज शिंदे हे बुलढाण्याचे खरात आहे. त्यांनी आदिवासी आश्रम शाळेच्या एका महिला कर्मचारी च्या माध्यमातून आदिवासी आश्रम शाळेच्या मुलींची ईज्जत लुटली, त्यांची जिंदगी बरबाद केली आहे, असा खोटा व खालच्या पातळीवरील आरोप त्यांनी केला.आमदार गायकवाड सातत्याने भाजपा नेत्यांच्या विरोधात खालच्या व नीच भाषेत वक्तव्य करून भाजपा पक्षाची बदनामी करत असतात.यापूर्वीही देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी साहेब, ना.देवेन्द्र्जी फडणवीस यांना खालच्या पातळीवर शिवीगाळ केलेली आहे, आ.संजय कुटे साहेब, ना.आकाशदादा फुंडकर यांच्या बद्दलही खालच्या भाषेत टीका केलेली आहे. या महाशयांनी ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या तोंडात जंतू कोंबणे पर्यंतची भाषा वापरलेली आहे. आ. श्वेताताई महाले पाटील यांच्याविषयी सातत्याने नाव न घेता खालच्या पातळीवर वक्तव्य करणे सुरु आहे ते संपूर्ण राज्य पाहत आहे. त्यांच्या अश्या गलीच्च व बेताल आरोपाने ते भाजपा पक्षाची सतत बदनामी करत असतात. विजयराज शिंदे साहेब यांच्या बद्दलचे पत्रकार परिषदेतील हे वक्तव्य म्हणजे नीच पणाचा कळस आहे, यामुळे विजयराज शिंदे साहेबांचीच नव्हे तर भाजपा पक्षाची सुद्धा समाजात प्रचंड बदनामी व मानहानी झाली आहे. वास्तविक पाहता कोणताही पुरावा, कोणत्याही महिलेची व मुलीची तक्रार नसतांना विजयराज शिंदे साहेब यांच्या आदिवासी आश्रम शाळेत शिकत असलेल्या आदिवासी मुलींच्या विरोधात बेताल व बदनामी कारक वक्तव्य करून आमदार संजय गायकवाड यांनी त्या आदिवासी मुलींचे चारित्र्य हणन करून त्यांचे सामाजिक, कौटुंबिक आयुष्य व भविष्यातील जीवन उध्वस्त करण्याचे काम केले आहे. आज शासन कोट्यावधी रुपये खर्च करून आदिवासी मुलांना आश्रम शाळेच्या माध्यमातून शिक्षण देऊन समाजाच्या मूळ प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करत आहे. तर दुसरीकडे आमदार संजय गायकवाड असे बेताल वक्तव्य करून आदिवासी समाजाची आणि त्यांच्या मुलींची बदनामी करत आहे. त्यांच्या वक्तव्यामुळे आदिवासी समाज आपल्या मुलींना शिक्षणाकरिता आश्रम शाळेत पाठविणार नाही आणि शासनाचे प्रयत्न विफल ठरतील. कोणत्याही महिलेचे व आदिवासी मुलींचीं चारित्र्य हनन करणे हा गुन्हा आहे. गायकवाड यांच्या या वक्तव्यामुळे आदिवासी समाजात गैरसमज निर्माण होऊन आदिवासी आश्रम शाळेतील मुलींकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलू शकतो. त्यामुळे आदिवासी समाजात गायकवाड यांच्या विरोधात प्रचंड रोष आणि नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे आमदार संजय गायकवाड यांच्यावर आदिवासी समाजातील आश्रम शाळेतील मुलींचे चारित्र्य हणन केल्या प्रकरणी ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात यावी. तसेच भाजपा नेत्यांवरील व



भाजपा पक्षाची बदनामी कारक वक्तव्य केल्या प्रकरणी सुद्धा त्यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी , अन्यथा भारतीय जनता पार्टीच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सुद्धा निवेदना अंती भाजपा पदाधिकारी यांनी दिला आहे. निवेदन सादर करते वेळी, भाजपा जिल्हा महामंत्री दत्ता पाटील, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे, बुलढाणा शहराध्यक्ष मंदार बाहेकर, बुलढाणा ग्रामीण अध्यक्ष सतीश पाटील, नगरसेवक आकाश दळवी, कामगार नेते अण्णासाहेब पवार, कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष दत्ता शिंदे, सौ उषाताई पवार, मुकुंद देशपांडे, राहुल देशपांडे, सचिन टेंभिकर, मोहम्मद अकिल, अरविंद जाधव, बाळू ठाकरे, अंबादास घेवंदे,मोताळा मंडळ अध्यक्ष सचिन शेळके, किरण नाईक, सतीश देहाडराय, प्रा प्रभाकर वारे, सारंग एकडे,संदीप वानेरे यांसह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# डोणगाव पोलिस ठाण्यात काय चाललंय? ठाणेदार नागरे यांच्यावर गंभीर आरोपांचा भडका!

**जनसंचलन/ डोणगाव**

पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्यावर गंभीर आरोपांची मालिका उघड झाल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. त्यांच्या कार्यपद्धतीविरोधात संतापाची लाट उसळली असून तात्काळ बडतर्फीची जोरदार मागणी होत आहे. पत्रकार संदीप नारायणराव पळसकर यांनी पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल करत ठाणेदारांच्या कारभाराचा पर्दाफाश केला आहे. निवेदनानुसार, नागरे यांच्या निष्काळजी व बेफिकीर वर्तनामुळे सामान्य नागरिक हैराण झाले असून अनेक तक्रारी धूळ खात पडल्या आहेत. काही प्रकरणांमध्ये आरोपींना थेट पाठीशी घालण्याचा संशय व्यक्त होत असून त्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, माहिती अधिकाराखाली मागवलेल्या माहितीबाबतही टोलवाटोलवी करून अपूर्ण व उशिरा माहिती देण्यात आल्याने प्रशासनावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सुमारे १.८० लाखांच्या फसवणूक प्रकरणातही ठोस कारवाई न झाल्याने तक्रारदार संतप्त आहेत. गुन्हा दाखल असूनही आरोपी मोकाट फिरत असल्याने पोलीस यंत्रणेची कार्यक्षमता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. सामान्य माणसाला न्याय मिळणार तरी कधी?फ्फ असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, या सर्व प्रकाराची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करून ठाणेदार नागरे यांच्यावर कठोर कारवाई करावी, तसेच आरोपींना त्वरित अटक करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. अन्यथा २० एप्रिल २०२६ रोजी मुंबईतील गृह मंत्रालयासमोर आत्मदहन आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आल्याने प्रशासनाची झोप उडाली आहे. या प्रकरणामुळे डोणगावसह संपूर्ण तालुक्यात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, आता प्रशासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दुसर बीडचा यश साळवे बुलढाणा संघात; -२० स्पर्धेत चमकण्याची संधी!

**जनसंचलन/ बुलढाणा**

गुझदेर बी डिव्हिजन -२० क्रिकेट स्पर्धेसाठी बुलढाणा जिल्हा संघात दुसर बीड येथील युवा क्रिकेटपटू यश अनिल साळवे याची अंडर-१९ गटात निवड करण्यात आली आहे. ग्रामीण भागातून पुढे आलेल्या यशने आपल्या जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर ही संधी मिळवली आहे. गेल्या तीन ते चार वर्षांपासून यश सातत्याने क्रिकेटचा सराव करत असून नागपूर येथील बीसीए क्रिकेट अकॅडमीमध्ये त्याने व्यावसायिक प्रशिक्षण घेतले आहे. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्याने आपली खेळातील गुणवत्ता अधिक परिष्कृत केली असून त्याच्या मेहनतीचे फळ म्हणूनच ही निवड झाली आहे. यशच्या निवडीमुळे दुसर बीड गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा



रोवला गेला आहे. तसेच या भागातील तरुणांना क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे. यशच्या माध्यमातून दुसर बीड व परिसराला प्रथमच अशी मोठी संधी मिळत असल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत असून पुढील वाटचालीसाठी त्याला हार्दिक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८